# प्रबोधन
गोरेगाव

## २१ वा वार्षिक अहवाल
## २०००-२००१



# प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४
दूरध्वनी : ८७३ ४८६९

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदवलेली संस्था *(Regn. No. Mum. 46/72 GB BSD)* मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदवलेली संस्था *(Regn. No. F 2502 Mum)*

पदाधिकारी व कार्यकारी मंडळ
२०००-२००१

अध्यक्ष : **डॉ. मनोहर अद्वानकर** एम्.एस्सी., पीएच्.डी.
उपाध्यक्ष : **श्री. श्रीनिवास शिरसेकर** जी. डी. आर्ट
**श्री. सुरेश चव्हाण** बी.ए.

कार्यकारी मंडळ

कार्याध्यक्ष : **श्री. पांडुरंग पोखरकर** बी.एस्.सी.
प्रमुख कार्यवाह : **ॲड्. विकास रेळे** बी.ए.,एल्.एल्.बी.
सहकार्यवाह : **श्री. मिलिंद डुंबरे** बी.कॉम्.
**श्री. समीर त्रैलोक्य** बी.एस्सी.
खजिनदार : **श्री. नितिन शिंदे** बी.ए., डी.जे.

सभासद

**श्री. चंद्रकांत देऊलकर**
**श्री. भूषण काळे**
**श्री. सुनील कविश्वर**
**श्री. शशांक कामत** बी.कॉम्.
**श्री. चंद्रकांत पोतदार**
**श्री. विनोद निंबाळकर**
**श्री. सुधीर मिठबावकर** बी.एस्सी. बी.एड
**श्री. जेकब जॉन्सन**
**श्री. चाको मॅथ्यू**
**श्री. अनिल देसाई**

अंतर्गत हिशेब तपासनीस
**श्री. अनिल पाटील** सनदी लेखापाल

सनदी लेखापाल
**श्री. जयंत आपटे** बी.कॉम्.एफ्.सी.ए.

# प्रबोधन गोरेगाव


## प्रबोधन क्रीडाभवन

प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४

दूरध्वनी : ८७३ ४८६९


## २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २ सप्टेंबर २००१ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई-४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

१. प्रास्ताविक.

२. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजूरी देणे.

३. २०००-२००१ या वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद हिशेब तपासनीसांच्या अहवालासह वाचून मंजूर करणे.

४. नवीन वर्षाकरिता २००१-२००२ घटनेच्या कलम ७ इ. प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा).

५. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

६. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन,

**पांडुरंग पोखरकर**

कार्याध्यक्ष

**ॲड. विकास रेळे**

प्रमुख कार्यवाह

दि. १७ ऑगस्ट २००१

गोरेगाव, मुंबई

---

१ संस्थेचा जमाखर्च, प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई ४०० १०४ येथील संस्थेच्या कार्यालयात दि. २७ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट २००१ पर्यंत संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. कोणाही सभासदास त्याबाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक ३१ ऑगस्ट २००१ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

२ गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.

३ निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. ३० ऑगस्ट २००१ पूर्वी संस्था कार्यालयात संध्याकाळी ६ ते ७ या वेळात आणून द्यावेत. अर्जाचा नमुना सोबत दिला आहे. (परिशिष्ट ड).

१५) नियमानुसार नियमितपणे सभा घेण्यात आल्या आहेत.

१६) सभांची इतिवृत्ते लिहिण्यात आली आहेत.

१७) कार्यकारिणी सदस्यांपैकी कोणाचाही संस्थेच्या गुंतवणुकीशी संबंध नाही.

१८) कोणीही कार्यकारिणी सदस्य संस्थेचा धनको वा ऋणको नाही.

१९) मागील वर्षी हिशोबामध्ये आम्ही कोणतीही नियमबाह्यता दर्शविली नव्हती.

२०) धर्मादाय उपायुक्तांचे किंवा धर्मादाय सहआयुक्तांचे लक्ष्य वेधण्यासारखी कोणतीही विशिष्ट बाब आहे असे आम्हांस वाटत नाही.

मुंबई
दि. १० जुलै २००१

स्वाक्षरी/-
**आपटे आणि कं.**
सनदी लेखापाल

ज्ञान-कला-सेवा यांचा त्रिवेणी संगम !

प्रबोधन
गोरेगांव

२९ वर्षांच्या देदीप्यमान कालखंडामध्ये
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून

**प्रबोधन क्रीडाभवन**

या सर्वांगसुंदर क्रीडासंकुलाची निर्मिती, ज्यामध्ये
क्रिकेट, जिम्नॅस्टिक्स, अॅथलेटिक्स, टेबलटेनिस, योग, अॅरोबिक्स, कराटे व
नृत्य यांचे अष्टपैलू तज्ज्ञांकडून प्रशिक्षण उपलब्ध
तसेच सुसज्ज व्यायामशाळा, हेल्थक्लबमध्ये स्टीमबाथ, सौनाबाथ, जाकूझी इत्यादी.
सुविधांची सोय आणि आता
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सहकार्यातून साकार झालेले

## प्रबोधन जॉगर्स पार्क

**व**

टेनिस प्रशिक्षणाची आणि सरावाची सुविधा असलेली टेनिस अॅकॅडेमी आणि सुंदर **जॉगिंग ट्रॅक.**

---

मराठी, इंग्रजी व हिंदी साहित्याने परिपूर्ण

## प्रबोधनकार ठाकरे वाचनालय

आपणा सर्वांसाठी उत्तमोत्तम पुस्तके आणि बाळगोपाळांसाठी ज्ञान-मनोरंजनाचा मेवा

**प्रबोधन जॉगर्स पार्क** : सिद्धार्थ नगर, रस्ता क्र. १७, महात्मा गांधी मार्ग,
गोरेगाव (प.), मुंबई-४०० ०६२. दूरध्वनी : ८७८ २३२४

**संपर्क : प्रबोधन क्रीडाभवन,** प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर,
गोरेगाव (प.), मुंबई-४०० १०४ दूरध्वनी : ८७३ ४८ ६९

Contact us on: www.PRABODHAN.ORG

झाला. त्या भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी निघालेल्या शिवसेनेच्या मदत फेरीत संस्थेच्या वतीने रु. ११,१११/- चा धनादेश शिवसेना नेते श्री. राज ठाकरे यांच्या हाती सुपूर्त करण्यात आला. अशा रीतीने गोळा झालेल्या निधीतून भूकंपग्रस्त शाळांची नव्याने उभारणी करून देण्यात आली आहे.

## संस्थेचा वर्धापनदिन सोहळा

दि. ४ एप्रिल २००० रोजी गुढी पाडव्याच्या पूर्वसंध्येस वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त 'वाऱ्यावरची वरात' या नाटकाचा प्रयोग प्र. ठाकरे नाट्यगृह, बोरिवली येथे संस्थेतर्फे आयोजित करण्यात आला होता. संस्थेचा वर्धापनदिन सोहळा म्हणजे सभासदांचे घरगुती स्नेहसंमेलनच. याची प्रचिती या कार्यक्रमाच्या वेळेसही आली.

दि. २५ मार्च २००१ रोजी प्रबोधनचा या वर्षातील दुसरा वर्धापन दिन सोहळा, प्रबोधन क्रीडाभवनाच्या हिरवळीवर आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी शैलजा सुब्रमण्यम् यांचा ''लताची सुमधुर गाणी'' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. एस्.एस्.सी. परिक्षेत स्मरणीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा, त्याचप्रमाणे मैदानी खेळात प्राविण्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक व 'मुंबई महोत्सव' या अभिजात संगीताच्या कार्यक्रमाच्या तिकिट विक्रीचा शुभारंभ या वर्धापनदिन सोहळ्यात पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाग समिती अध्यक्ष व नगरसेवक श्री. सुनिल प्रभु उपस्थित होते. त्याचप्रमाणे गोरेगावच्याच नगरसेविका सौ. सुधा टेंबवलकर याही संस्थेवरील प्रेमामुळे उपस्थित होत्या. या वर्धापनदिन सोहळ्यात गोरेगावातील मराठी माध्यमाच्या शाळांतून सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकविणाऱ्या कुमारी वृंदा अंबादास कुलकर्णी व कुमार सुनील मारुती शेरे या अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनीचा व विद्यार्थ्याचा सत्कार करण्यात आला. त्यांना अनुक्रमे ९०% व ८८% टक्के गुण प्राप्त झाले होते. कुमारी वृंदा अंबादास कुलकर्णी हिने मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थीनीतून प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला. त्याचप्रमाणे गोरेगावातील मराठी माध्यमाच्या रात्रशाळांतून पांडुरंगवाडी येथील बालशिक्षण मंदिर ट्रस्टच्या रात्रविद्यालयाचा विद्यार्थी प्रदीप बालगुडे याने ६३% गुण मिळवून रात्रशाळातील विद्यार्थ्यांमधून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी प्रबोधनच्या प्रोजेक्ट २००० या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील गुणवंत खेळाडू मनीषा गावंडे, ब्रिनल कुटिन्हो, विवेक प्रताप सिंग, आरती मळेकर व इतर खेळातही प्राविण्य दाखविणाऱ्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. या वर्धापन दिनाचे औचित्य साधून एप्रिल २००१ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या 'मुंबई महोत्सव' या अभिजात संगिताच्या कार्यक्रमाच्या तिकिट विक्रीचा शुभारंभ मान्यवर नागरिक श्री. धर्मेश रामचरण पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. प्रबोधनच्या बहुतांशी सभासदांच्या सहकुटुंब, सहपरिवार उपस्थितीमुळे या कार्यक्रमास 'प्रबोधन' कुटुंबाच्या स्नेहसंमेलनाचे स्वरुप आले होते. शैलजा सुब्रमण्यम् यांच्या सुमधुर आवाजातील लता मंगेशकर यांच्या जुन्या जमान्यातील अवीट गोडीच्या गाण्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

## जॉगर्स पार्क वर्धापनदिन समारंभ

मे १९९९ रोजी उभारण्यात आलेल्या प्रबोधनच्या 'जॉगर्स पार्क' या वास्तूस एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पहिल्या वर्धापनदिनी दि. २० मे २००० रोजी 'एक शाम सुदेश भोसलेके नाम' या सुदेश भोसले यांच्या सदाबहार गाण्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन भाईदास सभागृहात करण्यात आले होते.

### सभासदांसाठी करमणूक कार्यक्रम

'प्रबोधन' च्या सर्व सन्माननीय सभासदांसाठी 'एका लग्नाची गोष्ट' हे नाटक प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह, बोरिवली येथे दि. २६-८-२००० रोजी विनामूल्य दाखविण्यात आले.

### महाराष्ट्राचे लाडकं व्यक्तिमत्व : पु. ल. देशपांडे

आपल्या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाने मराठी मनावर मोहिनी घालणारे त्याचप्रमाणे नाटक, चित्रपट, मराठी वाड्मय, विनोदी व्यक्तिचित्रे, संगीतकार व इतर कलेच्या क्षेत्रात ज्यांचा अनिरुद्ध संचार होता असे थोर साहित्यिक व महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व श्री. पु. ल. देशपांडे यांचे दि. १२ जून २००० रोजी निर्वाण झाले. श्री. पु. ल. देशपांडे यांनी संस्थेतर्फे आयोजित एकांकिका महोत्सवास त्यांनी आशिर्वादपर संदेश पाठवून आपले प्रेम व्यक्त केले होते. त्यांचा हा सहभाग संस्थेस नेहमीच स्फूर्तिदायक ठरत राहिल, यात शंकाच नाही. महाराष्ट्राच्या या थोर साहित्यिक सुपुत्रास संस्थेतर्फे व संस्थेच्या सर्व सभासदांतर्फे आमचा मानाचा मुजरा.

## 'प्रबोधन' चे क्रीडाक्षेत्रातील व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील महत्वाचे योगदान :

### मे उन्हाळी शिबीर

शालेय विद्यार्थ्यांनी मे महिन्यातील उन्हाळी सुट्टीचा उपयोग अंगच्या कलागुणांना व क्रीडागुणांना वाव देण्यासाठी करावा या हेतूने संस्थेने प्रबोधन क्रीडाभवनाच्या स्थापनेपासूनच मे महिन्यात उन्हाळी शिबीर भरविण्यास सुरुवात केली. यंदाच्या वर्षीचे हे शिबीर दि. १५ एप्रिल ते २७ मे २००० या कालावधीत आयोजित करण्यात आले होते व त्यात क्रिकेट, अॅथलेटिक्स्, जिम्नॅस्टिक्स्, कराटे व चित्रकला या वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचा शेकडो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. दि. २७ मे २००० रोजी झालेल्या समारोप सोहळ्यात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या अंगचे कलागुण प्रकट केले.

### प्रोजेक्ट २०००

प्रोजेक्ट २००० या महत्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत भाग घेणाऱ्या खेळाडूंना संस्थेतर्फे नाश्ता, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व खेळांसाठी लागणारे साहित्य देण्यात येते. श्री. रवी बागडी यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली मनीषा गावंडे, ब्रिनल कुटीन्हो, विवेक प्रतापसिंग व आरती मळेकर या खेळाडूंनी अनेक स्पर्धांत भाग घेतला व आपल्या खेळातील चमक दाखविली.

**मनीषा गावंडे :** हिने १६ वर्षाखालील मुलींच्या वेगवेगळ्या लांब पल्ल्यांच्या धावण्याच्या शर्यतीत भाग घेऊन बक्षिसे मिळविली. त्यातील महत्त्वाची खालीलप्रमाणे :

वांद्रे येथील आंतरशालेय क्रॉसकॅन्ट्री स्पर्धेतील
३ कि.मी. धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक,
मायलो रायन मिनीथॉन ४ कि.मी. धावणे प्रथम क्रमांक

दहिसर रोडरेस ३ कि.मी. धावणे प्रथम क्रमांक
प्रियदर्शनी पार्कवरील जिल्हास्तरीय स्पर्धा
१५०० मी. व ३००० मी. धावणे प्रथम क्रमांक
सोलापूर येथील ज्युनि. राज्यस्तरीय स्पर्धा ८०० मी. धावणे - चवथा क्रमांक

१८ वी राष्ट्रीय मल्लखांब अजिंक्यपद स्पर्धा
झांशी, उत्तरप्रदेश (दि. ३०, ३१ डिसें. २००० व १ जाने. २००१)
कु. मंगेश वायकूळ, कु. कुणाल तामसे व कु. भाविन शहा यांनी आपापल्या गटात प्रथम क्रमांक पटकाविताना सांघिक अजिंक्यपद मिळविले.

६ वी मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब अजिंक्यपद स्पर्धा
मुंबई (२६ व २७ जाने. २००१)
ही स्पर्धा प्रबोधनच्या कुणाल तामसे, तेजस म्हात्रे, मंगेश वायकूळ, गौतम वझे व सुनिल वडगुजर या खेळाडूंनी गाजविली व अनेक स्पर्धा प्रकारात वैयक्तिक पारितोषिके मिळविली व १८ वर्षाखालील मुलांचे सांघिक विजेतेपद मिळविले व १२ वर्षाखालील मुलांच्या गटात द्वितीय क्रमांक पटकाविला.
'प्रबोधन' चा मंगेश वायकूळ हा मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू या पुरस्काराचा मानकरी ठरला. जिम्नास्टिक्सचे प्रशिक्षक श्री. दत्ताराम दुदम हे प्रबोधनच्या स्थापनेपासूनच कार्यरत आहेत, हे नमूद करण्यास आम्हांस आनंद होतो.

**खो-खो :** खो-खो या हिंदुस्थानी खेळाची मौज व खेळाडूंचे खेळण्याचे कसब या दोन्ही गोष्टी हिंदुस्थानला अभिमान वाटाव्यात अशाच आहेत. या अस्सल भारतीय खेळाच्या प्रसारासाठी 'प्रबोधन' ही संस्था सदैव अग्रेसर राहिली आहे, हे सांगण्यास आम्हास अभिमान वाटतो. प्रबोधनच्या खेळाडूंची सरस कामगिरी खालीलप्रमाणेः

तुषार मोरे व शशांक परब या प्रबोधनच्या खेळाडूंनी लातूर येथे फेब्रुवारी २००१ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य पुरुष संघाचे यशस्वी प्रतिनिधीत्व केले.

त्याचप्रमाणे 'प्रबोधन'च्या सत्यम चाळके, संजय चंदने, गणेश सावंत या खेळाडूंनी वेगवेगळ्या सामन्यात आपल्या खेळाची चमक दाखविली. त्याचप्रमाणे प्रबोधनचे प्रशिक्षक व खेळाडू शशांक कामत, उमेश भायदे, विकास पवार, संतोष परब यांची वेगवेगळ्या निवड समित्यांवर व प्रशिक्षक पदी नियुक्ती करण्यात आली.

आम्हांस याठिकाणी नमूद करण्यास आनंद वाटतो की, श्री. विकास पवार हे 'प्रबोधन क्रीडाभवना'च्या स्थापनेपासून खो-खो चे प्रशिक्षक असून श्री. शशांक कामत हे प्रबोधन चे कार्यकारिणी सदस्य आहेत.

**टेबल टेनिस** प्रबोधन चे मार्गदर्शन श्री. केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन शेट्टी या खेळाडूने टेबल टेनिसमध्ये मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले व पश्चिम विभागीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले, तर अखिल भारतीय पातळीवरील दिल्ली, जामनगर व ग्वाल्हेर येथे घेण्यात आलेल्या स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकाविला.

**कराटे :** प्रबोधनचे प्रशिक्षक श्री. सिताराम चव्हाण व श्री. नायर यांनी भोपाळ, मुंबई व बंगलोर येथे घेण्यात आलेल्या अखिल भारतीय पातळीवरील स्पर्धांत सातत्याने तीन वर्षे सुवर्णपदक मिळविले.

**ऋणनिर्देश :** संस्थेच्या आजवरच्या वाटचालीत अनेक मान्यवर दानशूर व्यक्तिंचे, संस्थांचे त्याचप्रमाणे सेवाभावी व सक्रीय कार्यकर्त्यांचे सदैव पाठबळ लाभले. त्यामुळेच संस्थेस जोमाने वाटचाल करता आली. त्या सर्वांचे ऋण फेडता येणे अशक्यच आहे. त्या ऋणानुबंधातच राहण्यात संस्थेस सदैव अभिमान वाटत राहिल. यापुढच्या वाटचालीतही त्या सर्वांचे सक्रीय सहकार्य संस्थेस लाभेल असा आम्हास विश्वास वाटतो. सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या संस्थेच्या सेवकवर्गाचेही आजवरच्या सक्रीय वाटचालीतील महत्त्वाचे योगदान आहे. गोरेगावातील आमदार श्री. गजानन किर्तीकर व श्री. नंदकुमार काळे यांचा फार मोठा आधार संस्थेस लाभला आहे. त्याचप्रमाणे गोरेगावातील सर्व नगरसेवक सर्वश्री सुनिल प्रभु (प्रभाग समिती अध्यक्ष), राम म्हात्रे, दिलीप शिंदे, दिलीप पटेल, रामचंद्रन पिल्ले, सौ. सुधा टेंबवलकर व सौ. साधना माने यांचेही सक्रीय साहाय्य व मार्गदर्शन वेळोवेळी संस्थेस होत असते. त्याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने यंदाच्या आर्थिक वर्षात रु. ६०,०००/- चे अनुदान दिले आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारचे जिल्हा क्रिडाधिकारी यांनी लोकनृत्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व व्यायामशाळेतील अद्ययावत उपकरणे घेण्यासाठी वेळोवेळी संस्थेस आर्थिक सहाय्य केले आहे, हे या ठिकाणी आवर्जुन नमूद करावेसे वाटते. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पी/दक्षिण विभाग अधिकारी, त्याचप्रमाणे गोरेगाव पोलिस स्टेशनचे पोलिस अधिकारी यांचे संस्थेस वेळोवेळी सक्रीय सहाय्य लाभले आहे, त्याचाही याठिकाणी उल्लेख करणे आवश्यक आहे. संस्थेस वेळोवेळी अर्थसहाय्य करणाऱ्या अनेक संस्थांची 'प्रबोधन-गोरेगाव' ही संस्था अत्यंत ऋणी आहे. त्या सर्वांचे प्रेम व ऋणानुबंध सतत वृद्धिंगत होत राहो हीच आई जगदंबेच्या चरणी प्रार्थना !

कार्यकारी मंडळ
**प्रबोधन गोरेगाव**